MHKO100002112019

## रे.क.नं. ३०/२०१९ मधील निशाणी क्र. ५३ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी २ व ३ यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ श्रीमती रत्नाबाई आण्णाप्पा कागिलकर ही दिनांक ११/०९/२०१९ रोजी मयत झाली आहेत. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी हे वयोवृध्द असून बी.पी. व शुगरचा त्रास आहे. सदरचे प्रतिवादीचे वारस हे मुळ दाव्याच्या कामी रेकॉर्डवर असलेने पुन्हा तशी दुरुस्ती करावे लागते याची माहिती व ज्ञान नसलेने तशी त्यांनी वकीलांना माहिती दिली नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे.

**४.** प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की,वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणुन बुजून विलंब केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ही मयत आहे अशी पुरसीस देवूनही वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब केलेला आहे. सबब वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

वादी यांचा निशाणी क्र. २४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०३/०३/२०२१

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100002112019

**रे.क.नं. ३०/२०१९ मधील निशाणी क्र. २५ वरील आदेश**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ श्रीमती रत्नाबाई आण्णाप्पा कागिलकर ही दिनांक ११/०९/२०१९ रोजी मयत झाली आहे. प्रस्तुतकामी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वादी हे वयोवृध्द असून बी.पी. व शुगरचा त्रास आहे. सदरचे प्रतिवादीचे वारस हे मुळ दाव्याच्या कामी रेकॉर्डवर असलेने पुन्हा तशी दुरुस्ती करावे लागते याची माहिती व ज्ञान नसलेने तशी त्यांनी वकीलांना माहिती दिली नाही. त्यामुळे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे.

४. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की,वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणुन बुजून विलंब केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ही मयत आहे अशी पुरसीस देवूनही वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब केलेला आहे. सबब वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाई ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता वादी यांनी केलेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **<u>आ दे श</u>**

वादी यांचा निशाणी क्र. २५ वरील अर्ज, प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र ) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०३/०३/२०२१

(म. ता. खराडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज

MHKO100002112019

## रे.क.नं. ३०/२०१९ मधील निशाणी क्र. २६ वरील आदेश

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ श्रीमती रत्नाबाई आणाप्पा कागिलकर ही दिनांक १९/०९/२०१९ रोजी मयत झाली आहे. त्यांना प्रतिवादी क्र. २ ते ६ हेच सरळ व कायदेशिर वारस असून याशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

४. वादी यांनी सदरचा दावा हक्कज्ञापनाकरीता व कायम मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांनी निशाणी २५ वर प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेबा विलंब माफीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आ दे श

**१)** वादी यांचा निशाणी क्र. ३० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र. १ च्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2021.03.03 17:25:38 +0530

ठिकाण – गडहिंग्लज　　(म. ता. खराडे)
दिनांक ०३/०३/२०२१　　सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज